# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:26.06.2026** **वार:शुक्रवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नेदरलँड्सच्या राणी मॅक्सिमा यांच्यात नवी दिल्लीत चर्चा
2. येत्या 5 वर्षांत भारतात 48 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याची ॲमेझॉनची घोषणा
3. युनायटेड किंगडम सोबतचा मुक्त व्यापार करार हा भारताने आतापर्यंत केलेला सर्वात व्यापक करार - वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल
4. व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या पुरवठ्यावरील निर्बंध सरकारने हटवले
5. व्हेनेझुएलामध्ये विनाशकारी भूकंपात आतापर्यंत 235 जणांचा मृत्यू;15शे जखमी आणि
6. महिला टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा बांगलादेशवर विजय

**<u>मोदीभेट</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नेदरलँड्सच्या राणी तसंच संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक सल्लागार मॅक्सिमा यांच्यात काल नवी दिल्लीत बैठक झाली. या बैठकीत दोन्ही नेत्यानी भारताच्या 'डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांबाबत चर्चा केली. डिजिटल क्रांतीमुळे देशातील आर्थिक सेवा कशा अधिक सुलभ आणि परवडणाऱ्या झाल्या आहेत, आणि त्यामुळे सामान्य नागरिकांचं जगणं सुलभ होत असून मोठ्या प्रमाणावर लोकांचं सक्षमीकरण कसं होत आहे, यावर चर्चा झाल्याचं मोदी यांनी सांगितलं.

**<u>ॲमेझॉन-गुंतवणूक</u>**

ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँडी जॅसी यांनी काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. आगामी पाच वर्षांत भारतात 48 अब्ज डॉलर्सची मोठी गुंतवणूक करण्याची घोषणा ॲमेझॉनने केली आहे. या गुंतवणुकीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणि क्लाउड पायाभूत सुविधांसाठी 21 अब्ज डॉलर्सहून अधिक निधीचा समावेश आहे. 2030 पर्यंत 38 लाख रोजगारांना चालना देणे, 80 अब्ज डॉलर्सच्या ई-वाणिज्य निर्यातीला प्रोत्साहन देणे तसंच दीड कोटी लघुउद्योजक आणि 40 लाख सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांपर्यंत एआयचे लाभ पोहोचवण्याचं उद्दिष्ट कंपनीनं ठेवलं आहे. भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेला यामुळे नवी गती मिळणार आहे. जागतिक गुंतवणूकदारांचा भारतावरील वाढता विश्वास यामुळे अधोरेखित होत असून, या गुंतवणुकीमुळे भारतातील तरुणांसाठी नव्या संधी निर्माण होतील असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान-सेशेल्स</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून तीन दिवसांच्या सेशेल्स दौऱ्यावर जात आहेत. सेशेल्सच्या राष्ट्रीय दिन सोहोळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून मोदी उपस्थित राहतील. 2015 मध्ये पंतप्रधानांनी सेशेल्सचा दौरा केला होता. सेशेल्सच्या राष्ट्रीय दिन सोहळ्यात भारतीय संरक्षण दलाचं एक पथक आणि भारतीय नौदलाची दोन जहाजं सहभागी होणार आहेत.

**<u>गोयल</u>**

युनायटेड किंगडम सोबतचा मुक्त व्यापार करार FTA- हा भारताने आतापर्यंत केलेला सर्वात व्यापक करार असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे. लंडनमध्ये काल आयोजित 'इंडिया ग्लोबल फोरम' च्या 'यूके-इंडिया वीक' कार्यक्रमात ते बोलत होते. या करारामुळे अनेक क्षेत्रात आर्थिक लाभ होणार असल्याचं ते म्हणाले. 15 जुलैपासून अंमलात येणाऱ्या 'भारत-यूके सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करारा'च्या अंमलबजावणीसाठी दोन्ही देशांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी गोयल तीन दिवसांच्या ब्रिटन दौऱ्यावर आहेत.

**अमित शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज नवी दिल्ली इथे 'नार्को-कोऑर्डिनेशन सेंटर'च्या 10 व्या उच्चस्तरीय बैठकीचं अध्यक्षपद भूषवतील. बैठकीत केंद्रीय मंत्रालये, राज्य सरकारे आणि अंमली पदार्थ विरोधी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी एकत्र येत आहेत. देशभरातील अंमली पदार्थांची तस्करी आणि त्यांचा गैरवापर रोखण्यासाठीच्या प्रयत्नांचा आढावा घेऊन ते अधिक बळकट करण्यासाठी या बैठकीत चर्चा होणार आहे.

**नाणेनिधी-भारत**

इराण-अमेरिका संघर्ष आणि वाढत्या इंधन दरांचा परिणाम होऊनही, जागतिक आर्थिक विकासाला चालना देणारा प्रमुख देश म्हणून असलेलं भारताचं स्थान कायम राहिल्याचं आंतरराष्ट्रीय नाणेनिधी म्हणजेच आयएमएफने म्हटलं आहे. नाणेनिधीने आयोजित केलेल्या वार्ताहर परिषदेत, संपर्क विभागाच्या संचालिका जुली कोझॅक यांनी ही माहिती दिली. बाह्य आव्हानांचा सामना करतानाच देशांतर्गत मागणीच्या बळावर भारताची अर्थव्यवस्था लवचीक राहिली आहे, असं त्यांनी म्हटलं आहे. 2026-27 या आर्थिक वर्षात भारताचा विकासदर 6 पूर्णांक 5 टक्के राहील असा अंदाज आयएमएफने कायम ठेवला आहे.

**एलपीजी**

पश्चिम आशियातल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर बिगर घरगुती वापरासाठी असलेल्या एलपीजी सिलिंडर पुरवठ्यावर लागू करण्यात आलेले सर्व निर्बंध केंद्र सरकारने पूर्णपणे हटवले आहेत. यामुळे औद्योगिक, व्यावसायिक आणि सेवा क्षेत्रातल्या ग्राहकांना एलपीजीचा पुरवठा पूर्वीप्रमाणे सुरळीतपणे उपलब्ध होणार आहे. तसंच, संकटकाळात बंद करण्यात आलेल्या घाऊक एलपीजी पुरवठ्याच्या नियमांमध्येही शिथिलता देण्यात आली आहे.

**मुहर्रम**

मुस्लिम बांधवांच्या वतीनं देशभरात आज मुहर्रम पाळला जात आहे. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचे नातू हजरत इमाम हुसेन आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हौतात्म्याची स्मरण करून देणारा हा दिवस आहे. या निमित्ताने ठीकठिकाणी 'ताझिया' मिरवणुका काढल्या जाणार आहेत.

**नीट**

नॅशनल टेस्टिंग एजन्सी NTAने 21 जून रोजी झालेल्या नीट यूजी पुनर्परीक्षेच्या तात्पुरत्या उत्तरतालिकांवर आक्षेप नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उत्तरतालिका www.neet.nta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. 28 जूनपर्यंत प्रति प्रश्न 200 रुपये शुल्क भरून विद्यार्थी प्रश्नांवर आक्षेप घेऊ शकतात. आक्षेप ग्राह्य धरला गेल्यास हे शुल्क पूर्णपणे परत केले जाईल.

**अयोध्या तक्रार**

श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र देणगी प्रकरणी उत्तर प्रदेश सरकारनं कठोर पावलं उचलत, आठ आरोपी आणि अज्ञात व्यक्तींविरोधात एफआयआर दाखल केला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या निर्देशानुसार, विशेष तपास पथकाच्या शिफारशीनंतर प्राथमिक चौकशी अहवाल दाखल करण्यात आला आहे. श्रीराम न्यासाचे सदस्य कृष्णमोहन यांच्या लेखी तक्रारीवरून स्थानिक पोलिस ठाण्यात फिर्याद निंदवण्यात आली आहे.

**महाराष्ट्र-माहिती**

माहिती अधिकार कार्यकर्ते, माजी माहिती आयुक्त, पत्रकार आणि अन्य काही सदस्यांच्या एका गटाने महाराष्ट्र सरकारला कायदेशीर नोटीस बजावली आहे. या नोटिशीद्वारे त्यांनी 'माहिती अधिकार नियम, 2026' रद्द करण्याची मागणी केली आहे; या नियमांमधील अनेक तरतुदींमुळे नागरिकांचा माहिती मिळवण्याचा अधिकार कमकुवत होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

**व्हेनेझुएला**

व्हेनेझुएला मध्ये काल झालेल्या दोन शक्तिशाली भूकंपामध्ये मरण पावलेल्यांची संख्या आता 235 वर पोहोचली आहे, तर 1 हजार 520 जण जखमी झाले आहेत; याशिवाय आणखी 200 जण अजूनही ढिगाऱ्याखाली अडकले आहेत.नॅशनल असेंब्लीचे अध्यक्ष जॉर्ज रॅाड्रिग्ज यांनी ही माहिती दिली आहे. राजधानी काराकसच्या पश्चिमेला सुमारे 160 किलोमीटर अंतरावर दोन शक्तिशाली भूकंप लागोपाठ झाल्यामुळे जवळ जवळ तीन हजार घरं उद्ध्वस्त झाली. 1900 नंतर व्हेनेझुएलाला बसलेला हा दुसरा - सर्वात शक्तिशाली भूकंपाचा धक्का होता. राजधानी काराकसच्या उत्तरेकडील 'ला गुएरा'या किनारपट्टीच्या भागात सर्वाधिक नुकसान आणि जीवितहानी झाली आहे. इथल्या 250 इमारतींचं नुकसान झालं तर अनेक पूर्णपणे नष्ट झाल्या. व्हेनेझुएलाच्या प्रभारी राष्ट्राध्यक्ष डेल्सी रॅाड्रिग्ज यांनी आणीबाणी जाहीर केल्यानंतर शाळा-महाविद्यालयं, आणि अत्यावश्यक नसलेल्या इतर सर्व सेवा –स्थगित करण्यात आल्या आहेत.

**फिफा**

फिफा विश्वचषकातील फिलाडेल्फिया इथे झालेल्या 'गट ई' च्या सामन्यात, निकोलस पेपेने दोन गोल केले. आणि आयव्हरी कोस्टने कुरासाओचा 2-0 असा पराभव केला. इक्वेडोरविरुद्धचा 1-0 असा सुरुवातीचा विजय आणि जर्मनीविरुद्धचा 2-1 असा पराभव यांनंतर झालेल्या या विजयामुळे आयव्हरी कोस्टने 'गट ई'मध्ये सहा गुणांसह पहिल्यांदाच विश्वचषकाच्या बाद फेरीत (नॉक आऊट फेरीत) धडक मारली.

**महिला टी-20**

महिला टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या 'अ' गटाच्या सामन्यात भारताने बांगलादेशचा पाच खेळाडू राखून पराभव केला. इंग्लंडमधील मँचेस्टर इथे  काल रात्री झालेल्या या सामन्यात बांग्लादेश संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला; आणि निर्धारित 20 षटकांत 136 धावा केल्या. भारताने 5 खेळाडू गमावत, हे लक्ष्य सतराव्या षटकातच पूर्ण केलं. शेफाली वर्माने 34 चेंडूंत 53 धावा केल्या. तिला 'सामनावीर' घोषित करण्यात आलं. या विजयानंतर सहा गुणांसह भारत 'अ' गटामध्ये दुसऱ्या स्थानावर आहे.

**क्रिकेट**

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये, आज बेलफास्ट इथे भारत आणि यजमान आयर्लंड संघा दरम्यान पहिला टी 20 सामना होत आहे. भारतीय वेळेनुसार सायंकाळी 6 वाजता सामना सुरू होईल. भारत आणि आयर्लंड यांच्यातील दुसरा आणि अंतिम टी-20 आंतरराष्ट्रीय सामना परवा रविवारी होणार आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.